# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.11.2024** **वारःशनिवार**

---

1. भुवनेश्वर इथं होणाऱ्या पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला पंतप्रधान संबोधित करणार
2. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम अर्थात यूआयपी अंतर्गत सुमारे 7 कोटी 43 लाख लाभार्थ्यांची नोंदणी
3. 70 किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सुमारे 14 लाख आयुष्मान वय वंदना कार्ड जारी
4. प्रयागराज मध्ये होणारा महाकुंभ मेळा हे वैश्विक एकतेचं प्रतिक असल्याचं केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांचं प्रतिपादन आणि
5. 19 वर्षांखालील पुरुषांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना पाकिस्तानशी

**पंतप्रधान**

ओडिशातील भुवनेश्वर इथं आज आणि उद्या होणाऱ्या पोलीस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते या तीन दिवसीय परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं. देशातील वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि सुरक्षा प्रशासकांना राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विविध मुद्द्यांवर संवाद तसंच चर्चेसाठी व्यासपीठ निर्माण करणं हा या परिषदेचा हेतू आहे. दहशतवाद तसंच डाव्या विचारसरणीचा अतिरेकीवाद, किनारपट्टी सुरक्षा, नवे फौजदारी कायदे आणि अंमली पदार्थ यासह राष्ट्रीय सुरक्षेच्या महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत भर देण्यात आला. उल्लेखनीय सेवेसाठी दिले जाणारे राष्ट्रपती पोलिस पदकही या परिषदेत प्रदान करण्यात येणार आहे.

पंतप्रधान कार्यालयानं  प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे की, मोदी यांनी नेहमीच या परिषदेत स्वारस्य दाखवले असून नवीन कल्पनांना वाव देण्याच्या हेतूनं मुक्त आणि अनौपचारिक चर्चेच्या वातावरणाला प्राधान्य दिलं आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि पंतप्रधानांचे प्रधान सचिव पी. के. मिश्रा हे या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ओडिशाच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर काल संध्याकाळी भुवनेश्वरला पोहोचले. पंतप्रधानांनी बिजू पटनायक आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ जाहीर सभेला संबोधित केलं. त्यांनी विमानतळ ते राजभवन अशी पथफेरीही काढली. त्यानंतर मोदींनी पक्षाच्या प्रदेश मुख्यालयात भाजप खासदार आणि आमदारांशी संवाद साधला. ओडिशामध्ये प्रशासनाचा लोककेंद्रित दृष्टिकोन राखतानाच पक्षाची तळागाळातील स्थिती मजबूत करण्यावर भर या बैठकीत भर देण्यात आला. बैठकीला केंद्रीय मंत्री जुएल ओराम, धर्मेंद्र प्रधान, अश्विनी वैष्णव, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी आणि पक्षाचे इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते.

**यू-विन**

सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम अर्थात यूआयपी अंतर्गत सुमारे 7 कोटी 43 लाख लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. गरोदर महिलांना तसंच नवजात ते 16 वर्षांपर्यंतच्या मुलांना 12 रोगांसाठी या कार्यक्रमांतर्गत जीवनरक्षक लस देण्यात येते. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात म्हंटलं आहे की, संकेतस्थळावरील नोंदीनुसार 1 कोटी 26 लाख लसीकरण सत्रं आयोजित करण्यात आली असून सुमारे 27 कोटी 77 लाख लसीच्या मात्रा देण्यात आल्या आहेत.

नागरिक तसंच लसीकरणकर्त्यांसाठी मोबाइल अँपचा समावेश असलेल्या यू-विन डिजिटल प्लॅटफॉर्ममुळं लसीकरण सेवांबद्दल सुलभता आणि जागरूकता सुधारली असल्याचं पटेल यांनी म्हंटलं आहे. हे अँप गुगल प्ले स्टोअरवर डाऊनलोड साठी उपलब्ध आहे. यूआयपीच्या वार्षिक उद्दिष्टामध्ये सुमारे 2 कोटी 9 लाख गर्भवती महिला तसंच 2 कोटी 6 लाख अर्भकांचा समावेश आहे. 'Anytime Access, Anywhere' लसीकरण सेवा, आयुष्मान भारत आरोग्य खाती अर्थात एबीएचए आणि क्यूआर-आधारित ई-लसीकरण प्रमाणपत्र यासारख्या सुविधा देण्यासाठी यू-विन देशभर उपलब्ध करण्यात आलं आहे. यू-विन बद्दल जनजागृती करण्यासाठी मंत्रालयातर्फे व्यापक समाज माध्यम मोहीम देखील चालवण्यात येत आहे.

**आयुष्मान भारत**

आयुष्मान भारत-पंतप्रधान जन आरोग्य योजनेंतर्गत या महिन्याच्या 25 तारखेपर्यंत 70 किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सुमारे 14 लाख आयुष्मान वय वंदना कार्ड जारी करण्यात आल्याचं केंद्र सरकारनं म्हंटलं आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितलं की, या योजनेत आता 70 वर्षं किंवा त्यापेक्षा जास्त वयोगटातील कोणत्याही सामाजिक-आर्थिक स्थितीतील ज्येष्ठ नागरिकांना दरवर्षी 5 लाखांपर्यंत मोफत उपचार दिले जातात. या योजनेअंतर्गत लाभार्थी कुटुंबांची संख्या सुमारे साडेचार कोटी असून सुमारे 6 कोटी व्यक्तींचा यात समावेश आहे. 13 हजार 173 खासगी रुग्णालयांसह एकंदर 29 हजार 870 रुग्णालये या योजनेत समाविष्ट असून या योजनेअंतर्गत जनरल मेडिसिन, सर्जरी, ऑर्थोपेडिक, कार्डिओलॉजी आणि ऑन्कोलॉजीसह 27 प्रकारच्या वैद्यकीय शाखांमध्ये विविध प्रकारच्या 1961 प्रक्रियांसाठी कॅशलेस आरोग्य सेवांचा समावेश आहे.

**महाकुंभ**

प्रयागराज मध्ये होणारा महाकुंभ मेळा हे वैश्विक एकतेचं प्रतिक असल्याचं पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी म्हटलं आहे. काल महाकुंभ मेळ्याच्या पूर्वावलोकन कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. महाकुंभ म्हणजे संस्कृती, कला आणि हस्तकलेच्या जागतिक देवाणघेवाणीची संधी असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. मेळ्यात उत्तम निवास आणि वाहतूक व्यवस्था देण्यासाठी सरकार बांधील असल्याचंही ते म्हणाले. कार्यक्रमात उपस्थित परदेशी प्रतिनिधींनी आपल्या जवळच्या व्यक्तींना महाकुंभ साठी आमंत्रित करण्याचं आवाहन उत्तर प्रदेशचे पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री जयवीर सिंह यांनी केलं. यावेळी बऱ्याच देशांचे राजदूत आणि उच्चायुक्त उपस्थित होते.

**अश्विनी वैष्णव**

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आज एक दिवसाच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. सुरतमधील किम इथं बुलेट ट्रेन ट्रॅक स्लॅब निर्मिती केंद्राला ते भेट देतील. वडोदरा इथल्या प्लासेर इंडिया कारखान्यालाही मंत्री महोदय भेट देतील. त्यानंतर ते वडोदरा इथल्या गति शक्ती विद्यापीठाच्या दुसऱ्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल उपस्थित राहणार असून समारंभात विविध शाखांतील एकूण 239 विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

**सीतारामन**

सरकारनं किसान क्रेडिट कार्ड योजनेचा विस्तार मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि इतर क्षेत्रांमध्ये करून त्यात वैविध्य आणल्याचं दरभंगा इथं झालेल्या पतपुरवठा संपर्क कार्यक्रमात बोलताना निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. केंद्रीय अर्थसंकल्प आता महिलाकेंद्री ऐवजी महिलाप्रधान झाला असून येत्या काही वर्षांत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्यास याची देशाला मदत होईल, असं त्या यावेळी म्हणाल्या. बचत गटांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण आणि कौशल्य वाढीच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या ड्रोन दीदी प्रकल्पांचाही त्यांनी उल्लेख केला. या कार्यक्रमादरम्यान सीतारामन यांनी विविध योजनांच्या 49,000 हून अधिक लाभार्थ्यांना सुमारे 1 हजार 388 कोटी रुपयांचं कर्ज वाटप केलं. सीतारामन यांच्या बिहार दौऱ्याचा उद्या शेवटचा दिवस असून मधुबनी जिल्ह्यातील झंझारपूर इथं दुसऱ्या पतपुरवठा संपर्क कार्यक्रमात त्या सहभागी होतील.

**प्रसार भारती**

प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी काल चंदीगढ च्या दूरदर्शन आणि आकाशवाणी केंद्राला भेट दिली. दोन्ही ठिकाणच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सेहगल यांनी माध्यम संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेतला. आकाशवाणी परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षण आणि स्वच्छतेला चालना देण्याचा संदेश सेहगल यांनी यावेळी दिला. आकाशवाणीला अधिक प्रभावी आणि लवचिक संस्था बनवण्याच्या गरजेवर त्यांनी यावेळी भर दिला.

**क्रिकेट**

19 वर्षांखालील पुरुषांच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत 'अ' गटात आज सकाळी भारताचा पहिला सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी साडे दहा वाजता सुरू होईल. मोहम्मद अमानच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ आपल्या मोहिमेची सुरुवात विजयासह करण्याचा प्रयत्न करेल. दुसऱ्या सामन्यात शारजाह इथं संयुक्त अरब अमिरातीच्या संघाची लढत जपानच्या संघाशी होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी साडे दहा वाजता सुरू होईल. अ गटात भारत, पाकिस्तान, संयुक्त अरब अमिराती आणि जपान तर ब गटात श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि नेपाळ यांचा समावेश आहे.

**वादळ**

पुद्दुचेरी जवळील कराईकल आणि महाबलीपुरम भागात फेंजल चक्रीवादळ आज दुपारी ताशी 90 किलोमीटर वाऱ्याच्या वेगानं धडकण्याची शक्यता आहे. नैर्ऋत्य बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचं काल चक्रीवादळात रूपांतर झालं. या वादळामुळे या भागात मुसळधार पाऊस आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर पुद्दुचेरी प्रशासन कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी तयार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.